# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०३, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :२/एनजीसी/२००४/४७९
दिनांक : २३ सितम्बर २००४

प्रति,
प्राचार्य,
वनगंगा बहुउद्देशिय विकास संस्थेचे
बाजीरावजी करंजेकर कॉलेज ऑफ फार्मसी,
जमनापूर,नागझिरा रोड,साकोली,
जि.भंडारा-४४१ ८०२.

विषय- शैक्षणिक वर्ष २००४-०५ पासून विना अनुदान तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र फार्मसी पदवी संस्था सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत

संदर्भः- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांकः टिईएम-२००४/(२३५/०४) तांशि-१, दिनांक १ जून २००४

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून विना अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | औषधनिर्माणशास्त्र पदवी | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र रु.५०/-च्या स्टॅम्प पेपरवर या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून औषधनिर्माणशास्त्र ~~पदवी संस्था सन २००४-२००५ पासून विना अनुदान तत्वावर~~ सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.

C:\My Documents\JADHAV M.R\orders\Degree Pharmacy 2004-05.do

२. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम-३३८२/११९८३६/(१९०)/तांशि-१अ, दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस बंधनकारक असतील.

३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यांत यावे. शिक्षकवृंद व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

४. संस्थेने औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी निधी म्हणून रु.८.०० लाख भंडारा ग्रामीण बँक, साकोली शाखा येथे पावती क्रं डीबीडी-जेओ३/२०२९९, दि.२५/६/२००४ अन्वये संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच द्वितीय वर्षासाठी पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी रु.७.०० लाख संयुक्त खात्यात जमा करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाचे शुल्क शिक्षण शुल्क समितीने मंजूर केल्याप्रमाणे आकारण्यात यावे.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके,नियतकालिके इ. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व कुलसचिव, नागपूर विद्यापीठ,नागपूर यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे.तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. या संचालनालयाने किंवा नागपूर विद्यापीठ,नागपूर यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परिक्षा, कुलसचिव, नागपूर विद्यापीठ,नागपूर यांच्याकडून घेतल्या जातील.

~~१०.संस्थेला कुलसचिव, नागपूर विद्यापीठ,नागपूर यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.~~

११.सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शै.व.२००४-०५ साठी प्रवेशनियमात विहित केलेल्या तरतुदीनुसार केंद्रिभूत प्रवेशप्रक्रियेद्वारे करण्यांत येतील.

१५.विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फी किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१६.सदर अभ्यासक्रमासाठी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील व सदर अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता मिळाली नाही तर सदर अभ्यासक्रम तात्काळ बंद करावा लागेल अन्यथा होणाऱ्या परिणामास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

१७.शासनाने, या संचालनालयाने , कुलसचिव, नागपूर विद्यापीठ,नागपूर व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.

( प्रा. न. वा. पासलकर )
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:

१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर यांना माहितीस्तव सादर.
३. कुलसचिव, नागपूर विद्यापीठ,नागपूर यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
४. कार्यासन क्रमांक १० मुख्य कार्यालय,मुंबई.
५. श्री.एन. वी.पाटील,सिस्टिम ॲनालिस्ट यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.